**कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सूचना:—**

१. प्रवेश अर्ज प्रक्रिया

सर्व प्रथम विद्यार्थी विद्यापीठाच्या वेब लिंकवर नोंदणी करुन पुढील कागदपत्रे अपलोड करणे —

- आधार कार्ड
- बॅंक पासबुक (बॅंक ऑफ महाराष्ट्र)
- पॅन कार्ड
- वार्षिक उत्त्पन्नाचा दाखला ( वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लाख पर्यंत व उत्पन्नाचा सक्षम अधिकारी दाखला )
- मागील वर्षाची गुणपत्रिका
- एक पासपोर्ट साइज फोटो

- वरील सर्व कागदपत्राची एक छायांकित प्रत कमवा व शिका ऑफिसमध्ये जमा करावी.

२. विद्यार्थी विकास मंडळ वरील विद्यार्थ्यांनी केलेली नोंदणी व अपलोड कागदपत्रे यांची प्रत्यक्ष तपासणी करेल.

३. वरिल प्रक्रिया पुर्ण झाल्यावर त्या विद्यार्थ्याला E&L ID देण्यात येईल.

४. विभागप्रमुखाचे कमवा व शिका योजनेसाठी विद्यार्थ्याचे ना हरकत प्रमाणपत्र.

५. कागदपत्रांची तपासणी प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर त्या विद्यार्थ्याचा योजनेतील प्रवेश निश्चित करण्याचा अधिकार विद्यार्थी विकास मंडळाकडे असेल.

६. कमवा व शिका योजनेत विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित झाल्यावर योजना कालावधीतील हजेरी Face Reading Mashine / Biomatric पद्धती द्वारे घेण्यात येईल.

७. कमवा व शिका योजनेतील प्रवेशीत विद्यार्थ्यांची मासिक हजरीचा तपशिल प्रत्येक विभागप्रमुखांनी दर महिन्याच्या २४ तारखेपर्यंत विद्यार्थी विकास मंडळास कळविणे अनिवार्य आहे.

८. विद्यापीठातील प्रत्येक कार्यक्रमास कमवा व शिका योजनेतील सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य आहे. (Special Attendance For Program)

## ९. विद्यार्थ्यांसाठी नियमावली —

१.योजनेतील प्रत्येक विद्यार्थ्यांकडे पुढील कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.

- आधार कार्ड
- बॅक पासबुक (बॅक ऑफ महाराष्ट्र)
- पॅन कार्ड
- वार्षिक उत्पन्नाचा दाखला ( वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लाख पर्यंत व उत्पन्नाचा सक्षम अधिकारी दाखला )
- मागील वर्षाची गुणपत्रिका

२. प्रवेशित विद्यार्थी या योजनेत केवळ दोनच वर्ष प्रवेशास व मोबदला घेण्यास पात्र असेल.
३. प्रथम शैक्षणिक वर्षात उर्तीण विद्यार्थी द्वितीय वर्षी कमवा व शिका योजनेस पात्र असेल.
४. विद्यापीठाच्या नियमानुसार सर्व शासकिय सुट्टी कमवा व शिका योजनेसाठी लागू असतील.
५. प्रत्येक विभागासाठी कमवा व शिका योजने अतंर्गत फक्त ५ विद्यार्थी दिले जातील, अधिक विद्यार्थ्यांची आवश्यकता असल्यास तसे विद्यार्थी विकास मंडळास कळविणे अनिवार्य आहे.
६. प्रत्येक विद्यार्थ्याची मासिक हजेरी ७५ टक्के असणे अनिवार्य आहे. ७५ टक्के पेक्षा हजेरी कमी असल्यास सदर महिन्याचे मानधन अदा केले जाणार नाही.
७. कमवा व शिका योजनेतील कामकाजाची वेळ —

- फिल्ड वर्क (सकाळी ६:०० ते सकाळी ९:००)
- कार्यालयीन काम (दुपारी ३:०० ते सांय. ६:००)

८. कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांचा कामाचा अहवाल व हजेरी तपशिल प्रत्येक विभागाने महिन्याच्या २५ तारखेपर्यंत विद्यार्थी विकास मंडळास देणे अनिवार्य आहे.
९. विद्यार्थ्यांची संपुर्ण माहिती व कागदपत्रे ऑनलाइन अपलोड झाल्या शिवाय अर्ज स्विकारल्या जाणार नाही.